# प्रेसनोट

दि. १३/०८/२०२४

## दुय्यम निबंधक कार्यालयातील लोकसेवकाकरीता दस्त नोंदणी केल्याचा मोबदल्यासाठी मध्यस्थी करणा-या खाजगी इसमावर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४३ वर्षे |
| आरोपी नाव व पत्ता | माधव वसंत नाशिककर, वय ६१ वर्ष, व्यवसाय - वकील, रा. पदमावती, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ३,०००/- (तीन हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- (तीन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ०७/०८/२०२४ रोजी. |
| सापळा दिनांक | दि. १३/०८/२०२४ |

ठिकाण :- दिनांक १३/०८/२०२४ रोजी वनराज रसवंती गृहासमोर रोडवर, खडकमाळ आळी, शिवाजीरोड, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीचे नावे सदनिका खरेदी केली असून, त्याची दस्त नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालय, क्र. १, हवेली, पुणे येथे केली होती. तक्रारदार यांनी दस्त नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी शासकीय फी (स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी व डॉक्युमेंट हाताळणी फी) एन.ई.एफ.टी. द्वारे ऑनलाईन जमा केली होती. तसेच दस्ताची नोंदणी झालेनंतर वकीलाची फी खाजगी इसम वकील माधव नाशिककर यांना दिलेली होती. त्यानंतर खाजगी इसम वकील माधव नाशिककर यांनी दस्त नोंदणी केल्याचा मोबदला म्हणून दस्त नोंदणी अधिकारी यांचेकरीता वकीलाचे फी व्यतिरिक्त तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, खाजगी इसम वकील माधव नाशिककर यांनी तक्रारदार यांचे दस्त नोंदणी केल्याचा मोबदला म्हणून दस्त नोंदणी अधिकारी यांचेकरीता पंचासमक्ष तडजोडीअंती ३,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, खाजगी इसम वकील माधव नाशिककर यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ३,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००

३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in

४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in

५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(माधुरी भोसले)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे